नियमित फौ.खटला क्रं.०५/२०१७

शासन वि. दिपा
निशाणी क्रमांक २३०

**नोटः-साक्षीदार टेभुर्णी पोलिस स्टेशन सोलापूर येथे हजर आहे व पुरावा दृकश्राव्य माध्यमाद्वारे नोंदविण्यात आला आहे.**

सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ३ ची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक कथन करतो की,

नाव : **मोनाली पोपट पवार**

वय : ३४ वर्ष,

व्यवसाय : पोलिस उपनिरीक्षक, टेभुर्णी पोलिस स्टेशन

राहणार : टेभुर्णी ता. जि.सोलापूर

सरकारतर्फे सरकारी वकील श्री.ए.ए.कोरे, यांच्या मार्फत सरतपास

१. दिनांक २४-०६-२०१६ रोजी मी तुळजापूर पोलिस स्टेशन येथे पोलिस उपनिरीक्षक म्हणुन कार्यरत होते. त्यादिवशी अप्पर पोलिस अधीक्षक दिपाली घाडगे यांनी फोन करुन बार्शी रोडवर घाटाच्या खाली गोपनीय काम असल्याने तुम्ही तेथे जावुन थांबा असे सांगितले. पावन रिसॉर्ट येथे जाधव महिला पोलिस मोरे व करवर असे आम्ही तेथे गेलो. पावन रिसॉर्टच्या मधुन कोणीतरी जाधव सरांना इशारा दिला व जाधव सरांनी मला इशारा दिला असता आम्ही तात्काळ पावन रिसॉर्टमध्ये रुम क्रमांक २ च्या दिशेने पळत गेलो. सदर रुमध्ये दोन महिला बसलेल्या होत्या. त्यापैकी एक महिला पैसे मोजत होती व दुसरी महिला बेडवर बसली होती. तेथे असलेल्या अधिका-यांनी पैसे मोजत असलेल्या महिलेस नाव विचारले असता तिने तिचे नाव दिपा वाघमारे असे सांगितले. दुस-या महिलेने रेशमा दिक्षीत असे नाव सांगितले. तेथे आम्हांला समजले की, सदर दोन महिला वेश्या व्यवसाय करीत आहेत. त्या संदर्भाने त्यांच्याकडील पैसा बाबत जप्तीचा पंचनामा व इतर कारवाई करण्यास सुरुवात झाली. आरोपी ही महिला असल्याने न्यायदंडाधिकारी यांची परवानगी घेवून रात्री आरोपी दिपा वाघमारे हिस अटक केली. मला त्यानंतर समजले की, आरेपी दिपा वाघमारे हि लातुर व इतर ठिकाणहुन महिला आणुन वेश्या व्यवसाय करीत आहे.

नियमित फौ.खटला क्रं.०५/२०१७
शासन वि. दिपा
निशाणी क्रमांक २३०

तपासी अंमलदार यांनी माझा जबाब नोंदवला होता. आरोपी दिपा वाघमारे हिस दाखवल्यास मी ओळखु शकेल. आज रोजी आरोपी दिपा वाघमारे न्यायालयात हजर नाही.

सरतपास पूर्ण.

**उलट तपास आरोपी क्रमांक २ ते ५, ७, ११, १२ व १३ तर्फे श्री. एस.एच.पवार, विधीज्ञ यांच्या मार्फत**

२. मी छापा टाकण्यासाठी जातेवेळी पोलिस स्टेशनला नोंद केली होती. त्या स्टेशन डायरीचा नोंद नंबर मला सांगता येणार नाही. मी व्यक्तीशा स्टेशन डायरीला नोंद घेतली नव्हती.

३. पोलिस उपनिरीक्षक जाधव यांनी मला इशारा दिल्यानंतर मी पावन रिसॉर्टमध्ये गेले होते. पावन रिसॉर्टच्या डॉक्युमेंट बाबत मला माहित नाही. ज्या रुममध्ये आम्ही गेलो त्याचे क्षेत्र मला सांगता येणार नाही. आरोपी दिपा वाघमारे मोजत असलेल्या नोटांचे क्रमांक मला सांगता येणार नाहीत.

४. प्रश्न:- पावर रिसॉर्ट व रुम नंबर २ मध्ये दोन महिला व्यतिरिक्त इतर पुरुष नव्हते ?

उत्तर:- पावन रिसॉर्टचे मालक तेथे होते. मी कारवाईच्या गोंधळात असल्याने इतरा बाबत माहित नाही.

५. दिपा वाघमारे सोबत पावन रिसॉर्टचे मालक यांना पोलिस स्टेशनला नेले होते. दिपा वाघमारे सोबत पावर रिसॉर्टचे मालक यांना अटक केली किंवा कसे हे मी तपासीक अंमलदार नसल्याने माहित नाही.

६. तपासी अधिका-यांने माझा जबाब घटनेच्या दुस-या दिवशी नोंदवला होता.

७. प्रश्न:- तपासी अधिक-याने तुम्हाला जबाबासाठी यावे म्हणुन नोटीस दिली होती का.?

उत्तर:- आम्ही एकाच पोलिस स्टेशनला असल्याने तशी नोटीस मला दिली

नियमित फौ.खटला क्रं.०५/२०१७
शासन वि. दिपा
निशाणी क्रमांक २३०

नव्हती.

८. हे म्हणणे खरे नाही की, मी रुम नंबर २ मध्ये गेले असता त्या ठिकाणी एकही पुरुष व्यक्ती नव्हता. मला त्या पुरुष व्यक्तीचे नाव सांगता येणार नाही.

९. हे म्हणणे खरे नाही की, पावन रिसॉर्ट या नावाचा रिसॉर्ट तुळजापूर तालुक्यात नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण .

फेरतपास नाही.

**उलट तपास आरोपी क्रमांक २ ते ५, ७, ११, १२ व १३ तर्फे श्री. एस.एच.पवार, विधीज्ञ यांच्या मार्फत घेण्यात आलेला उलट तपास आरोपी क्रमांक ८ तर्फे श्री. जे.एस.इंगळे, विधीज्ञ यांनी मान्य केला.**

**उलट तपास आरोपी क्रमांक २ ते ५, ७, ११, १२ व १३ तर्फे श्री. एस.एच.पवार, विधीज्ञ यांच्या मार्फत घेण्यात आलेला उलट तपास आरोपी क्रमांक ६, ९ व १० तर्फे श्री. ए.एस.पवार, यांनी मान्य केला.**

दिनांक:- ०१/०२/२०२४.

श्रवणोत्तर स्वीकृत
.
सही/-
(एम. एम. निकम)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग तुळजापूर